पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/४२८/२०२०
दिनांक - २०/०३/२०२०

प्रति,


मा............................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा दिनांक **२६/०३/२०२०** रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **गुरूवार**, दिनांक **२६/०३/२०२०** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १६८**

**दिनांक - २६/०३/२०२०** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरूवार,** दिनांक **२६/०३/२०२०** रोजी **दुपारी ०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये रूग्णाचा वाढता व्याप विचारात घेता सध्या आवश्यक असलेली अस्थायी स्वरूपातील २९ वरिष्ठ निवासी, ६३ कनिष्ठ निवासी, ५ वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ व ८ वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी, ९ वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु एम.ओ व २ वैद्यकिय अधिकारी बी.टी.ओ ही पदे एकत्रित मानधनावर तात्पुरत्या/ हंगामी स्वरूपात सहा महिनेकरीता भरणेकामी वृत्तपत्रात व मनपा संकेतस्थळावर जाहिरात क्र.२६५ दि.०१/०२/२०२० चे प्रकटन प्रसिध्द करून अर्ज मागविणेत आलेले आहेत. त्याअनुषंगाने वरील पदासाठी आलेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची गुणवत्तेवर व आरक्षणानुसार निवड व प्रतिक्षा यादी तयार करणेत आलेली आहे. त्यामधून प्रथम निवड झालेल्या १५ वरिष्ठ निवासी, ४१ कनिष्ठ निवासी, ५ सी.एम.ओ, ६ शिफ्ट ड्युटी, ६ आय.सी.ओ एम.ओ व १ बी.टी.ओ उमेदवारांना आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/१७९/२०२० दि.१८/०२/२०२० अन्वये नियुक्ती देणेत आलेली आहे. नियुक्ती आदेशात नमुद केलेल्या विहित मुदतीत १५ कनिष्ठ निवासी, १ सी.एम.ओ, २ शिफ्ट ड्युटी असे एकूण १८ उमेदवार रूजू झालेले नसल्याने व सदरचे रिक्त जागांची रूग्णालयास आवश्यकता असल्याने रिक्त जागा तातडीने भरणेकामी प्रतिक्षा यादीतील खालील तक्त्यातील उपलब्ध ३ कनिष्ठ निवासी, १ सी.एम.ओ व १ शिफ्ट ड्युटी उमेदवारांना आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/ २०२/२०२० दि.१२/०३/२०२० अन्वये नियुक्ती दिलेली आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | निवड प्रवर्ग | विभाग | पदनाम | एकूण मानधन प्रती महा. र.रू |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.पुष्कर देवेंद्र चौधरी | खुला | सर्जरी | कनिष्ठ निवासी | ५५०००/- |
| २ | डॉ.जिवन राजेंद्र पळसकर | इ.मा.व | सर्जरी | कनिष्ठ निवासी | ५५०००/- |
| ३ | डॉ. प्राजक्ता प्रमोद जंगम | इ.मा.व | बालरोग | कनिष्ठ निवासी | ५५०००/- |
| ४ | डॉ. सचिन आण्णासाहेब पाटील | भ.ज.क | सी.एम.ओ | वैद्यकिय अधिकारी | ५५०००/- |
| ५ | डॉ. संदिप रामकिशन तुमवाड | अ.जमाती | शिफ्टड्युटी | वैद्यकिय अधिकारी | ५५०००/- |

यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयास उपरोक्त पदांची आवश्यकता असल्याने प्रतिक्षा यादीतील उपलब्ध वरिल ५ उमेदवारांना आदेशाच्या तारखेपासून पुढे मुळ आदेशातील अंतिम दिनांक ०८/०९/२०२० पर्यंत तात्पुरत्या/हंगामी स्वरूपात एकत्रित मानधनावर नेमणुक देणेत आलेली आहे. सदर उमेदवारांना प्रती महा देणेत येणा-या एकत्रित मानधन खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी व उक्त नेमणुक आदेशान्वये नियुक्ती केलेले उमेदवार विहित मुदतीत कामावर रूजू न झालेस किंवा रूजू झालेले उमेदवार मुदतीपुर्वी सोडून गेल्यास अशा रिक्त होणा-या तसेच वरिल जाहिरातीनुसार पुरेशा प्रमाणात उमेदवार उपलब्ध न झाल्याने शिल्लक राहिलेल्या उर्वरीत रिक्त जागी पुढील सहा महिन्याकरीता Walk In Interview ने नेमणुका करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) कोरोना विषाणूचे संसर्गामुळे उद्भवत असलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महापालिका स्तरावरवैद्यकिय विभागामार्फत उपाययोजना करणेत येत असून याकरीता वैद्यकिय अधिकारी व स्टाफ नर्स संवर्गातील अधिकारी व कर्मचा-यांची आवश्यकता भासणार आहे. सद्यस्थितीत उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचा विचार करता नव्याने पदभरतीची प्रक्रिया राबविणेस विलंब लागणार लागू शकतो. त्यामुळे दि.०३ जानेवारी २०२० रोजीच्या मानधन भरती जाहिरातीमधील उपलब्ध असणा-या गुणानुक्रम यादीमधुन एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकिय अधिकारी (बीएएमएस) या संवर्गातील ०७ पदे व स्टाफ नर्स या संवर्गातील २४ पदे अशी एकुण ३१ वाढीव पदे उपलब्ध करून घेऊन वैद्यकिय विभागांतर्गत असणा-या रुग्णालयांमध्ये यापूर्वी निश्चित केलेल्या अटी, शर्ती व मानधनावर नेमणेस व सदरच्या पदांना द्यावयाच्या मानधनाचे अदायगीकरीता येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु संसर्गाचा धोका निर्माण झाला असून, सदर आजाराचा प्रादुर्भव रोखणे तसेच कोरोना आजारास अटकाव करणेकामी मनपामार्फत नवीन भोसरी रुग्णालयात कोरोना वॉर्डसाठी तातडीने कर्मचारी दैनंदिन साफसफाईच्या कामकाजाकरीता लागणारे आवश्यक ते मनुष्यबळ ४५ कर्मचारी व ४ सुपरवायझर उपलब्ध करुन देणेकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांना नवीन भोसरी रुग्णालयातील तयार करणेत आलेल्या कोरोना वॉर्डसाठी तातडीने २५ कर्मचारी उपलब्ध करून देण्यासाठी प्रथम आदेश देण्यात येवून तद्नंतर मा.स्थायी समितीची सध्या वाय.सी.एम. रुग्णालयाकरीता त्यांचे समवेत करण्यात आलेल्या करारनाम्यास अधिन राहून ४९ कर्मचा-यांकरीता किमान वेतन कायदयानुसार र.रु.१२,८८,६१४/- (अक्षरी र.रू.बारा लाख अठ्याऐंशी हजार सहाशे चौदा फक्त) प्रति महा प्रमाणे(सर्व खर्चासहीत) कोरोना वॉर्ड सुरु असेपर्यंत येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) कोरोनाच्या अटकावसाठी व कोरोनाच्या साथीचा सामना करण्यासाठी मनपाच्या जिजामाता रुग्णालय व अजमेरा येथील मनपा इमारती मध्ये 130 बेड चे कोरोना वार्ड तयार करणेकामी मे.कोठारी मेडीकल यांचेकडील प्राप्त लघुत्तम दर प्रती नग र.रू.9900/- प्रमाणे

एकुण 130 hospital bed with mattersand I.V ROD सह एकुण र.रु.12,87,000/- (अक्षरी र.रु.बारा लाख सत्याऐंशी हजार फक्त) मध्ये थेट पध्दतीने खरेदी करणेस चे खर्चास मान्यता व मे कोठारी मेडीकल यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५) कोरोनाच्या अटकावसाठी व कोरोनाच्या साथीचा सामना करण्यासाठी मनपाच्या आरोग्य विभागासाठी Mistblower SR 420 बनावटीचे औषध फवारणी मशिन मे.गुरुदत्त ॲग्रो एजन्सीज & सर्व्हिसेस यांचेकडील लघुत्तम दर प्रती नग र.रू.33,417/- प्रमाणे एकुण 24 नग मशिनसाठी एकुण र.रु.8,02,008/- (अक्षरी र.रु.आठ लाख दोन हजार आठ फक्त) मध्ये थेट पध्दतीने खरेदी करणेस चे खर्चास मान्यता व मे गुरुदत्त ॲग्रो एजन्सीज & सर्व्हिसेस यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६) मनपाच्या वैद्यकिय विभागाने मागणी केलेनुसार कोरोना या संसर्गजन्य रोगाचा भारतामध्ये प्रसार होत असुन कोरोना विषाणूच्या आजाराचा प्रसार तसेच प्रतिबंधासाठी घ्यावयाची काळजी व करावयाच्या उपाय योजना याबाबत पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील नागरिकांमध्ये जनजागृती / प्रबोधन होणेकामी १०० शेकडा पोस्टर्स तातडीने छपाई करुन घेणेकामी यापूर्वीचे निविदा मंजुर दरानुसार मे.विजय प्रिंटर, आकुर्डी यांचेकडून निविदा न मागवता, थेट पध्दतीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसुची प्रकरण ५ (२)(२) छपाई करुन घेणेकामी व सदर पोस्टर्स छपाई करणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.१,४४,५००/- (अक्षरी र.रू.एक लाख चव्वेचाळीस हजार पाचशे फक्त) ला मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/४२८/२०२०
दिनांक – २०/०३/२०२०

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.